:: **प्रेस नोट** :: दिनांक :- ०४/०७/२०२६

## सायबर फ्रॉड व ऑनलाईन गेमींग ॲप साठी बॅक अकाउंन्ट पुरवणारी टोळीस गुन्हे शाखेकडून अटक केलेबाबत.

गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-२, मुंबई येथे गोपनिय सुत्राकडून माहिती प्राप्त झाली की, रुम नं ३०३, तिसरा मजला, पार्श्व चेंबर्स, ईसाजी स्ट्रिट, मस्जीद बंदर पश्चिम मुंबई येथे जी. डी. ओव्हरसीज. या नावाने असणाऱ्या बोगस कंपनीचे ऑफीस असून मुंबईत वेगवेगळया बॅकामध्ये उघडण्यात आलेल्या नवीन करंट अकांऊन्टचे डिटेल्स व सिमकार्ड आणून ते सिम कार्ड व बॅंक अकांउन्ट अक्टिवेट करून सदरचे सिम कार्ड, दुबई येथे पाठवून गेमींग व सायबर फ्रॉडकरीता वापरले जातात.

गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-२, मुंबई येथील अधिकारी व अंमलदार यांनी नमुद ठिकाणी छापा टाकून टोळी प्रमुख आणि त्याचे पाच साथीदार यांना अटक करून त्यांच्याकडून वेगवेगळया बॅंकेचे एकुण ६६ अेटीएम कार्ड, दोन लिनोवो कंपनीचे संगणक, कॅनॉन कंपनीचा कलर प्रिंटर, १२ वेगवेगळया मोबाईल कंपनीचे सिमकार्ड, वेगवेगळया बॅकेचे १५ पासबुक, वेगवेगळया बॅकेचे एकुण १२२ चेक बुक, ०२ पेनड्राईव्ह, विविध कंपनीचे एकुण ६८ रबरी शिक्के, वेगवेगळया बॅकेचे अकाउंन्ट ओपनिग फॉर्म, विज बिले, विविध कंपनीचे उद्यम नोंदणी प्रमाणपत्रे इत्यादी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच त्यांच्याविरूध्द पायधुनी पोलीस ठाणे, गु.र.क्र. ७६०/२०२६, असा गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हयाचा पुढील तपास गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-२, मुंबई यांचे मार्फत करण्यात येत आहे. सदर गुन्हयातील अटक आरोपी यांना मा. न्यायालयाने हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांना दिनांक ०८/०७/२०२६ रोजीपर्यत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. कृष्ण कान्त उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी-दक्षिण, श्री. दिनकर शिलवटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ येथील प्रभारी पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप तेजनकर, पोनि प्रशांत गावडे, पो.उ.नि. शेख, पो.ह. बोरसे, थिटमे, पो.शि.घरत, जाधवर, सय्यद, आव्हाड, पो.उ.नि.चा.घाटोळ व पो.शि.चा. शिंदे, कळसाने यांनी केली आहे.